**क्रमांक :२०**

**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**बुधवार, दिनांक २ मार्च, २०२२/ फाल्गुन ११, १९४३ शके**

**२०.** महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) प्रमाणे बॅलटव्दारे काढण्यात आलेल्या आणि शुक्रवार, दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना देणा-या सदस्यांची क्रमवार सूची खालीलप्रमाणे आहे.

(१) **श्री. समिर मेघे, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३९**

"परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी "औरंगाबाद" या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्री. सुरेश भोळे, वि.स.स. यांचा ठराव क्र.४४**

"निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने "उस्मानाबाद" या शहराचे "धाराशीव" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्री.सुनिल प्रभु, वि.स.स. यांचा ठराव क्र. १८८**

"मुंबईसह राज्यात रेडी रेकनरच्या दरात दरवर्षी वाढ होत असल्याने, सदनिकांच्या किंमतीत प्रचंड वाढ होत असणे, विभागीय सर्वोच्च विक्री दर रेडिरेकनरमध्ये ग्राहय धरण्यात येत असल्याने, सदनिकांच्या किंमती, मुळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने वाढणे, यामुळे सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी रेडी रेकनरचे वाढते दर स्थिर ठेवण्यासाठी राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी याबाबत राज्य शासनाने आवश्यकती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) **श्री.पराग शहा, वि.स.स. यांचा ठराव क्र. ६८**

"निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने "उस्मानाबाद" या शहराचे "धाराशीव" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) **श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. यांचा ठराव क्र. १४**

"परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी "औरंगाबाद" या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २ मार्च, २०२२

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत:**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (website)

\\MLS-DATASERVER\F Branch\1-08 PC data\2022 FIRST SESSION\Resolution\Resolution-Bulletin as per ballot.doc